## जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर भरती प्रक्रिया–२०२३
## "कनिष्ठ लिपीक" पदाचे उमेदवारांना सुचना

संदर्भ :– मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क.ब(जन)–५६०१/५७/२०२४/१८७७,दिनांक १४/१०/२०२४.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांचे पत्र कमांक ब(जन)–५६०१/५७/२०२४/१८७७, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार "कनिष्ठ लिपीक" या पदाकरीता मराठी भाषेतील टंकलेखन परीक्षा दिनांक ०४/११/२०२४ रोजी सकाळी ८.१५ वाजेपासून **शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, बल्लारपूर बायपास रोड, चंद्रपूर** येथे घेण्यात येणार आहे. सदर परिक्षेकरीता पात्र उमेदवारांची यादी मा. उच्च न्यायालयांचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर परीक्षेकरीता उमेदवारांनी खालील तक्त्यात नमुद केलेल्या वेळेच्या एक तास पुर्वी न चुकता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, बल्लारपूर बायपास रोड, चंद्रपूर येथे उपस्थित राहावे.

परिक्षा सुरू झाल्यानंतर उशीराने आलेल्या उमेदवारांना परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर परीक्षेकरीता येतांना या कार्यालयाकडून पडताळणी करून दिलेले प्रवेश पत्र (Hall Ticket) सोबत आणणे अनिवार्य आहे.

### मराठी टंकलेखन (Marathi Typing) परीक्षेचे वेळापत्रक
### दिनांक ०४/११/२०२४

| मराठी टंकलेखन परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवाराच्या यादीतील अनुकमांक | एकूण उमेदवारांची संख्या | बॅच कमांक | मराठी टंकलेखन परीक्षेची वेळ | उपस्थित राहण्याची वेळ | गेट बंद होण्याची वेळ |
|---|---|---|---|---|---|
| ०१ ते १५५ | १५५ | १ | सकाळी ०८.१५ वाजता | सकाळी ०७.०० वाजता | सकाळी ०८.०० वाजता |
| १५६ ते ३१० | १५५ | २ | सकाळी ०९.१५ वाजता | सकाळी ०८.०० वाजता | सकाळी ०९.०० वाजता |
| ३११ ते ४६५ | १५५ | ३ | सकाळी १०.१५ वाजता | सकाळी ०९.०० वाजता | सकाळी १०.०० वाजता |
| ४६६ ते ६१९ | १५४ | ४ | सकाळी ११.१५ वाजता | सकाळी १०.०० वाजता | सकाळी ११.०० वाजता |

भरती प्रकियेच्या कार्यकमानुसार मराठी टंकलेखन परीक्षेचा निकाल दिनांक ०७/११/२०२४ रोजी तसेच इंग्रजी टंकलेखन परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची इंग्रजी टंकलेखन परिक्षा दिनांक ०९/११/२०२४ रोजी घेण्यात येईल. मराठी टंकलेखन परिक्षेचा निकाल प्रसिध्द झाल्यानंतर इंग्रजी टंकलेखन परिक्षेचे वेळापत्रक जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथील सुचना फलकावर व अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

मराठी टंकलेखन परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवाराच्या यादीतील अनुकमांक हा त्यांचा आसनकमांक (Seat No.) राहील.

टिप :–१) संगणकाचे मराठी/इंग्रजी भाषा टंकलेखन परीक्षेकरीता उमेदवार स्वत:चा की बोर्ड (Keyboard) (USB) वापरू शकतील. परंतु Keyboard मध्ये काही तांत्रीक अडचण किंवा बिघाड झाल्यास त्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. निवड समिती जबाबदार राहणार नाही.

२) परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

३) जिल्हा न्यायालयाचे संकेत स्थळ खालीलप्रमाणे आहे.
**http://chandrapur.dcourts.gov.in**

18/10/24

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
चंद्रपूर.